**विभागाची माहिती (About the Department)**

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, बार्टी, पुणे मार्फत समता, सामाजिक न्याय, स्वातंत्र्य, बंधुभाव, जातीय दुर्भावनांचे समूळ उच्चाटण, वैज्ञानिक दृष्टीकोन, सामाजिक, नैतिक मूल्यांचे संवर्धन करण्यासाठी ज्या महामानवांनी आपले आयुष्य खर्च केले त्यांचे जीवनचरित्र व विचार आम जनतेमध्ये खोल रूजले जावे व जनतेने यातून प्रेरणा घेऊन सामाजिक सलोखा निर्माण व्हावा या महत्त्वपूर्ण व प्रेरणादायी उद्देशाने संबंधित विषयांवरील विविध पुस्तकांचे मुद्रण, प्रकाशन व वितरण या संस्थेमार्फत केले जात आहे. यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिराव फुले, सावित्रीबाई फुले, छत्रपती शहू महाराज, संत गाडगेबाबा, बसवेश्वर, भगवान गौतम बुद्ध, सयाजीराव गायकवाड इ. अनेक थोर समाजसुधारकांचे जीवनकार्यावर आधारित नामवंत लेखकांच्या पुस्तकांचा समावेश आहे.
- आत्तापर्यंत एकूण **2,096 शाळा, 46 महाविद्यालये, 41 शासनमान्य नोंदणीकृत सार्वजनिक वाचनालये, 15,000 ग्रामपंचायती आणि 26 विविध संघटना व सेवाभावी संस्थांना पुस्तकांचे विनामूल्य वितरण करण्यात आले आहे**.
- दि. 18 फेब्रुवारी 2016 च्या मा. नियामक मंडळाच्या बैठकीतील मंजूर विषय क्र. 52 अन्वये व दि. 27 जून 2016 रोजी मा. महासंचालक, बार्टी, पुणे यांनी प्रकाशन विभागाच्या घेतलेल्या आढावा बैठकीतील निर्णयान्वये बार्टीकडे सद्यस्थितीत उपलब्ध असलेली पुस्तके शाळा, महाविद्यालये, सार्वजनिक वाचनालये यांना विनामूल्य व खासगी व्यक्ती, स्वयंसेवी संस्था, नोंदणी नसलेली वाचनालये इ. ना मूळ किंमतीच्या 15% इतकी रक्कम आकारून वितरित करण्यात येत आहे. सदर उपक्रमास सर्वच स्तरातून प्रचंड प्रतिसाद प्राप्त झाला असून आत्तापर्यंत महाराष्ट्रातील विविध जिल्हयांतील हजारो लाभार्थ्यांनी पुस्तकांचा लाभ घेतला आहे. सदर उपक्रमाचा अप्रत्यक्ष परिणाम शाळा, महाविद्यालये, सार्वजनिक वाचनालये यांचेमध्ये जागृती निर्माण होऊन त्यांचेकडूनही मोठया प्रमाणात विनामूल्य पुस्तकांचा लाभ घेतला जात आहे.
- पुस्तकांचे माध्यमातून समता व सामाजिक न्यायावर आधारित विचारधारा पोहोचवून जनजागृतीचे सदर काम बार्टीला अव्याहतपणे करता यावे याकरीता याआधी खरेदी करण्यात आलेल्या व काही नव्याने प्राप्त प्रस्तावांअन्वये बार्टीचे ध्येय उदिदष्टांना अनुसरून असलेल्या पुस्तकांच्या खरेदीस व वितरणास मा. नियामक मंडळाची मान्यता घेण्यात आली आहे. यात मराठीप्रमाणेच हिंदी व इंग्रजी राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय स्तरावरील दर्जेदार पुस्तकांचा समावेश करण्यात आला आहे.

**विनामूल्य पुस्तके मिळण्याकरीता प्रक्रिया (How to Apply Process or Eligibility)**

- विनामूल्य पुस्तके घेऊ इच्छिणाऱ्या शाळा, महाविद्यालये अथवा वाचनालयाच्या प्रतिनिधींनी संबंधित संस्था प्रमुखांच्या सही शिक्क्यानिशी बार्टीचे पुणे येथील कार्यालयात मागणीपत्र सादर करणे आवश्यक आहे.
- पुस्तके घेणेकरीता संबंधित संस्थेच्या प्रतिनिधींनी बार्टीचे पुणे येथील कार्यालयात प्रत्यक्ष येणे आवश्यक आहे.
- **15% दराने पुस्तके मिळण्याकरीता प्रक्रिया:-**
- 15 टक्के दराने पुस्तके बार्टीचे पुणे कार्यालयात रोख रक्कम भरून मिळतील.
- 15 टक्के दराने पुस्तके मिळविण्याकरीता इच्छुक व्यक्ती अथवा संस्थांनी पॅन कार्डची झेरॉक्स प्रत देणे अनिवार्य आहे

- पुस्तके घेणेकरीता संबंधित व्यक्ती/संस्थेच्या प्रतिनिधींनी बार्टीचे पुणे येथील कार्यालयात प्रत्यक्ष येणे आवश्यक आहे.

**फलश्रुती (Achievements)**

- बार्टीमार्फत विनामूल्य पुस्तक वितरण उपक्रमा अंतर्गत आत्तापर्यंत एकूण 2,096 शाळा, 46 महाविद्यालये, 41 शासनमान्य नोंदणीकृत सार्वजनिक वाचनालये, 15,000 ग्रामपंचायती आणि 26 विविध संघटना व सेवाभावी संस्थांना पुस्तकांचे विनामूल्य वितरण करण्यात आले आहे.
- 15 टक्के दराने पुस्तक वितरण उपक्रमा अंतर्गत आत्तापर्यंत सुमारे 4000 व्यक्ती व संस्थांना सशुल्क पुस्तक वितरण करण्यात आले आहे.
- पुस्तके वितरणाकरीता बार्टीमार्फत विविध दिनविशेष व महापुरूषांच्या जयंती व स्ममृतीदिनानिमित्त महाराष्ट्रातील विविध जिल्हयांत स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम व समतारथादवारे प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करून तसेच विविध संस्था, संघटनांमार्फत आयोजित कार्यक्रमांमध्ये येणाऱ्या प्रेक्षकांना वितरणाकरीता पुस्तके उपलब्ध करून महाराष्ट्रभर पुस्तक वितरण व त्या माध्यमातून सामाजिक न्याय व समतेवर आधारित विचार घराघरात पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यातील काही महत्वपूर्ण कार्यक्रमांचा उल्लेख खालीलप्रमाणे,

1. दि. 14 व 15 जुलै 2016 दरम्यान छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त पुणे येथे आयोजित राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत महाराष्ट्राच्या विविध जिल्हयांतून सहभागी झालेल्या स्पर्धकांना पुस्तकांचे वितरण
2. दि. 1 ऑगस्ट 2016 रोजी अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त पुणे येथे आयोजित राज्यस्तरीय गायन स्पर्धेत महाराष्ट्राच्या विविध जिल्हयांतून सहभागी झालेल्या स्पर्धकांना पुस्तकांचे वितरण
3. दि. 19 ऑगस्ट 2016 रोजी यु.पी.एस.सी परिक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या टिना डाबी या अनुसूचित जातीतील प्रथम महिलेचा मुंबई येथे आयोजित भव्य सत्कार कार्यक्रमात टीना डाबीसह उपस्थित पेक्षकवर्गास बार्टीमार्फत पुस्तके वितरित करण्यात आली.
4. दि. 7 सप्टें. 2016 रोजी आद्य क्रांतीवीर उमीजीराजे नाईक यांच्या जयंतीनिमित्त त्यांचे जन्मगावी भिवडी, ता. पुरंदर, जि. पुणे येथे उपस्थित हजारो नागरिकांना बार्टीमार्फत पुस्तक वितरण करण्यात आले. समतारथाचे माध्यमातून प्रश्नमंजुषेच्या उपक्रमादवारे विजेत्या उमेदवारांना बक्षिसरूपात पुस्तकवाटप
5. दि. 26 सप्टेंबर 2016 रोजी पुणे करारानिमित्त सर्वसामान्य नागरिकांकरीता पुणे येथे आयोजित एकपात्री प्रयोग व व्याख्यानांचे कार्यक्रमाकरीता उपस्थित नागरिकांना बार्टीमार्फत पुस्तक वितरण करण्यात आले
6. दि. 10 ते 14 ऑक्टोबर 2016 रोजी धम्मचक्रप्रवर्तन दिनानिमित्त दिक्षाभूमी, नागपूर येथे आयोजित ग्रंथोत्सवात हजारो नागरिकांना बार्टीमार्फत पुस्तक वितरण करण्यात आले. समतारथाचे माध्यमातून प्रश्नमंजुषेच्या उपक्रमादवारे विजेत्या उमेदवारांना बक्षिसरूपात पुस्तकवाटप करण्यात आले.
7. दि. 11 नोव्हें. 2016 ते 14 नोव्हें. 2016 या कालावधीत नागपूर येथे आयोजित ॲग्रो व्हिजन प्रदर्शनात सहभाग घेऊन महाराष्ट्रातून आलेल्या शेतकरी बांधवांना बार्टीमार्फत सामाजिक समता व न्यायावर आधारित पुस्तकांचे वितरण करण्यात आले.
8. दि. 24 नोव्हें. 2016 ते दि. 28 नोव्हें. 2016 दरम्यान कऱ्हाड, सातारा येथे आयोजित यशवंतराव चव्हाण कृषी प्रदर्शनात बार्टीमार्फत पुस्तक वितरणाचे नियोजन करण्यात आले आहे

9. दि. 26 नोव्हेंबर 2016 रोजी संविधान दिनानिमित्त व 6 डिसेंबर 2016 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त विविध संस्थांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात वितरणाकरीता बार्टीचे प्रकाशन विभागामार्फत संविधानाच्या प्रास्ताविका, पॉकेट कॅलेंडर आणि पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली.

10. 6 डिसेंबर 2016 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी, मंबई येथे येणाऱ्या हजारो नागरिकांना बार्टीमार्फत पुस्तक वितरण करण्यात आले. समतारथाचे माध्यमातून प्रश्नमंजुषेच्या उपक्रमादवारे विजेत्या उमेदवारांना बक्षिसरूपात पुस्तकवाटप करण्यात आले.

11. 25 डिसेंबर 2016 रोजी मनुस्मृती दहन दिनाचे स्मरणार्थ, महाड येथे येणाऱ्या हजारो नागरिकांना बार्टीमार्फत पुस्तक वितरण करण्यात आले. समतारथाचे माध्यमातून प्रश्नमंजुषेच्या उपक्रमादवारे विजेत्या उमेदवारांना बक्षिसरूपात पुस्तकवाटप करण्यात आले.

12. दि. 1 जानेवारी 2017 रोजी शौर्य दिनानिमित्त भिमा कोरेगाव येथे जमा होणाऱ्या हजारो नागरिकांना पुस्तकांचे वितरण करण्यात आले व समतारथाचे माध्यमातून प्रश्नमंजुषेच्या उपक्रमादवारे विजेत्या उमेदवारांना बक्षिसरूपात पुस्तकवाटप करण्यात आले.

13. दि. 14 जानेवारी 2017 रोजी औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर दिनाच्या स्मरणार्थ औरंगाबाद येथे जमा होणाऱ्या हजारो नागरिकांना पुस्तकांचे वितरण करण्यात आले व समतारथाचे माध्यमातून प्रश्नमंजुषेच्या उपक्रमादवारे विजेत्या उमेदवारांना बक्षिसरूपात पुस्तकवाटप करण्यात आले.

14. दि. 1 फेब्रुवारी 2017 ते 15 फेब्रुवारी 2017 दरम्यान हरयाण राज्यात आयोजित आंतरराष्ट्रीय पुस्तक मेळाव्यात सहभागी होऊन नागरिकांना पुस्तकांचे वितरण करण्यात आले

15. साहित्य संमेलने, विविध संस्थांनी आयोजित केलेल्या स्पर्धा, कार्यक्रम, सामाजिक उपक्रम प्रसंगी वितरणाकरीता मागणीनुसार पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली. उदा. दि. रोजी पिंपरी चिंचवड येथे आयोजित साहित्य संमेलनात पुस्तक वितरण, 15 ऑगस्ट, 26 जानेवारी रोजी विविध शाळा, महाविद्यालये, संस्था, संघटनांनी आयोजित कार्यक्रमांमध्ये वितरणाकरीता बार्टीमार्फत पुस्तकांचा पुरवठा करण्यात आला.

प्रगतीपथावर असलेले प्रकल्प:-

**पाली त्रिपिटकाचे मराठीत भाषांतर**:- महाराष्ट्र शासन निर्णय क्र बैठक-2015/प्र.क्र.131/बांधकामे दि. 13 जानेवारी 2016 अन्वये पाली त्रिपिटकाचे मराठीत भाषांतर कामाकरीता उचित निर्णय घेण्याकरीता गठित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय समितीला सदर कामाकरीता सहाय्य करण्याकरीता मा. महासंचालक, बार्टी यांचे अध्यक्षतेखाली उपसमिती गठित करण्यात आली आहे. महेश देवकर, विभाग प्रमुख, पाली विभाग, सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ यांचेकडून पाली त्रिपिटकाचे मराठीत भाषांतर करणे कामाचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे. सदर प्रस्ताव मान्यतेस्तव शासनाकडे पाठविण्यात आला आहे. शासन स्तरावरून मान्यता मिळताच सदर कामास सुरूवात करण्यात येणार आहे.

**प्रकल्पाची व्याप्ती**:- बार्टीचे पुस्तक वितरणाचे सदर उपक्रमांअंतर्गत महाराष्ट्राच्या 36 जिल्हयांमधील हजारो व्यक्ती, संस्था, शाळा, महाविद्यालये, वाचनालये, ग्रामपंचायती आदींनी मौल्यवान पुस्तकांचा लाभ मिळविला आहे. याव्यतिरिक्त नागपूर, औरंगाबाद, सातारा व पुणे अशा विविध जिल्हयांमध्ये

आरती डोळस<br>
प्रकल्प संचालक

(प्रकाशन व प्रसिध्दी विभाग)